पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती तंत्रज्ञान विभाग
क्र.- मातंवि/१/कावि/३०७/२०१५
दिनांक.९/११/२०१५

## परिपत्रक

**विषय – संगणकिय पासवर्ड दक्षतेबाबत**
**(Password protection & security)**

महानगरपालिकेचे बहुतांशी दैनंदिन कामकाज हे e-governance प्रकल्पांतर्गत संगणकीकृत झाले असुन त्यासाठी प्रत्येक विभागाचे कामकाजाचेदृष्टीने संगणक प्रणाली तयार करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणालीद्वारे कामकाज करण्यासाठी संबंधित प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे role नुसार Username व Password देणेत आलेले आहेत. सदर देण्यात आलेल्या Username व Password साठी संबंधित अधिकारी/कर्मचारी जबाबदार असल्याने संबंधितांनी आपले Password कोणत्याही दुस-या कर्मचा-यास / नागरिकांस देऊ नयेत व ते वेळोवेळी बदलण्याची दक्षता घ्यावी. तसेच आपली कामाची वेळ अथवा शिफ्ट संपल्यानंतर किंवा कामकाजाची जागा सोडल्यास संगणक प्रणालीचे वापरामधुन logout करावे अन्यथा आर्थिक बाबींमध्ये अथवा अधिकृत माहितीमध्ये बदल करणेसारखे काही गैरवापर झाल्याचे आढळुन आल्यास ज्यांचे login ID व password वापरुन बदल करणेत आला आहे त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना जबाबदार धरणेत येईल याची नोंद घ्यावी.

तसेच विभागातुन बदली झालेनंतर अधिकारी/कर्मचारी यांनी स्वत: माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधुन आपल्या टेबल अथवा कामकाजासंबंधीत विविध प्रणालींसाठी देणेत आलेले Login निरस्त करुन घ्यावे व ज्या विभागात बदली झाली आहे त्या विभागासाठी नविन Username व Password तयार करुन घेणेत यावेत.

विभाग प्रमुखांनी सदरचे परिपत्रक सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन द्यावे व password protection बाबत दक्षता घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.